भाषा संचालक, भाषा संचालनालय या पदाचा अतिरिक्त कार्यभार पुढे सुरु ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग

शासन आदेश क्रमांक:-अतिका-२०१९/प्र.क्र.४०/आस्था-२,
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १५.०३.२०१९

संदर्भ : १) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन-१३११/प्र.क्र.१७/सेवा-३, दि. २७.१२.२०११
२) मराठी भाषा, शासन निर्णय क्र. बदली-२०१७/प्र.क्र.५/२०१७/-२, दि. ३१.०३.२०१७
३) भाषा संचालनालयाचे पत्र क्र.रापअ(नियुक्ती)-२०१७/प्र.क्र.४६/३२७/चौदा, दि. २५.०२.२०१९.

शासन आदेश

भाषा संचालनालयातील "भाषा संचालक" हे पद दि. ०१.०४.२०१७ पासून रिक्त आहे. संदर्भ २ अन्वये सदर रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार दि. ०१.०४.२०१७ पासून श्री. हर्षवर्धन तु. जाधव, अवर सचिव, मराठी भाषा विभाग यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

संदर्भ ३ अन्वये भाषा संचालनालयाच्या पत्रास अनुसरुन दि. ०१.०४.२०१८ पासून पुढे १ वर्षपर्यंत किंवा सदर पद विहित मार्गाने भरले जाईपर्यंत यापैकी जे अगोदर होईल तोपर्यंत भाषा संचालक या पदाचा अतिरिक्त कार्यभार पुढे सुरु ठेवण्यास या आदेशाद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तुत आदेश संदर्भ १ येथील वित्त विभागाच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक **२०१९०३१५१२२६५७८८३३** असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने**,**

M. P. Kudtarkar

Digitally signed by M. P. Kudtarkar
Date: 2019.03.15 12:56:46 +05'30'

(मं.प.कुडतरकर)
कार्यासन अधिकारी

प्रति,

१) महालेखापाल- १, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
२) महालेखापाल- १, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
३) महालेखाकार (स्थानिक निवासी लेखापरीक्षा व लेखा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६) भाषा संचालक,भाषा संचालनालय,वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
७) श्री. ह.तु. जाधव, अवर सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
८) सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
९) निवड नस्ती / आस्था-२, मराठी भाषा विभाग.